ePaper

**बारावीची परीक्षा आजपासून... गेल्यावर्षीपेक्षा विद्यार्थिसंख्येत वाढ...**



वर्ष - 9 । अंक - 165 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™



पान 2 वरुन...

मावळात भाजपचा सुफडासाफ!

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 10 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत "कमळ" फुलले!



# पंचायत ते पार्लमेंट भाजपा नं.1.!

महाईन्यूज । पुणे

**राज्यातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, परभणी, लातूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या जिल्हा परिषदांचे निकाल जाहीर झाले. राज्यातील सत्तेत प्रमुख पक्ष असलेल्या भाजपाने सर्वाधिक जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळवली आहे. महायुतीतील शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षालाही काही ठिकाणी यश मिळाले आहे. महाविकास आघाडीला जिल्हा परिषदा निवडणुकीतही फार चांगला कामगिरी करता आली नाही.**

राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. १ असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचे म्हटले जात आहे.

## राज्यात सर्वाधिक जागा घेत भाजपाची हॅटट्रिक

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि रविंद्र चव्हाण यांच्या नियोजनाच्या बळावर भाजपाने राज्यात सर्वाधिक जागा मिळविण्याची अनोखी हॅटट्रिक प्राप्त केली आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या नगर परिषद निवडणूका, त्यानंतर जानेवारीत झालेल्या महानगरपालिका निवडणुका आणि या फेब्रुवारी महिन्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत देवेंद्र आणि रविंद्र या राजकीय पॉवरफुल जोडीने अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचार यंत्रणा पद्धती, स्थानिक पातळीवरील पक्षासोबत राज्य पातळीवरील पक्षाचा थेट संवाद आणि समन्वय अशा विविध माध्यमातून भाजपाला उच्च दर्जाची सक्षम पक्ष यंत्रणा उभारली. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेतृत्वाचा वरदहस्त लाभला आणि धाकही जाणवला. याचा सकारात्मक परिणाम होऊन पक्षाने अनेक ठिकाणी अत्यंत आश्चर्यकारक आणि धक्कादायक विजय नोंदवले. या यशाचे मुख्य



शिल्पकार देवेंद्र फडणवीस तर सूत्रधार रविंद्र चव्हाण हे आहेत हे निर्विवादपणे म्हणावे लागेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

दरम्यान, रविंद्र चव्हाण यांना निवडणूक सिद्ध नेता म्हणून ओळखले जाते. ते जमिनीवर वावरणारे आणि कार्यकर्त्यात रमणारे प्रदेशाध्यक्ष आहेत. निवडणुकीत अत्यावश्यक असणारे आडाखे वापरताना विचारधारेच्या धाग्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना जोडणारे असे त्यांचे नेतृत्त्व आहे म्हणूनच दिल्ली आणि नागपूर दोन्ही सत्ताकेंद्रांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्याच बरोबर त्यांना देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा आणि सहकार्य कायम मिळतच असते, असे सांगितले जात आहे.

# मावळात भाजपचा सुफडासाफ!

## भाजपचा एकही उमेदवार विजयी नाही; आ. सुनील शेळकेंनी केला घणाघात

**महाईन्यूज । पुणे**

**मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाचही गटामधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) पक्षाच्या उमेदवारांचा विजय झाला आहे. मावळ पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकला आहे. दहापैकी दहाही सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये भाजपचा एकही सदस्य निवडून आला नसून सुफडासाफ झाला आहे. त्यानंतर आमदार सुनील शेळके यांनी भाजपवर तोफ डागली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार सुनील शेळके म्हणाले, मावळच्या जनतेने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. जिल्हा परिषदेच्या पाचही गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आणि मावळ पंचायत समितीमधील दहाही गणातील उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे मावळच्या जनतेचे मी मनापासून आभार मानतो. हा विजय अजितदादांना समर्पित करतो. मावळची जनता प्रामाणिक, इमानदार असून त्यांनी मतदानातून दाखवून दिले आहे.

प्रचारामध्ये भाजपने घड्याळाची टिकटिक बंद करणार असल्याचे सांगितले होते. याबाबत विचारले असता आमदार सुनील शेळके म्हणाले, माजी आमदार बाळा भेगडे आणि भाजपने मावळ तालुक्यात गलिच्छ राजकारण सुरु ठेवले आहे. स्वत:चे कुटुंब, आर्थिक व्यवस्था सक्षम करायची आणि दुसऱ्याच्या कुटुंबात भांडणे लावायची. दुसऱ्यांची कुटुंबे आर्थिक उधवस्त करत आहेत. यापुढे तरी मावळच्या सर्वसामान्य जनतेला अडचणीत, संकटात टाकू नये. आर्थिक खड्ड्यात घालू नये. अशा पद्धतीचे राजकारण बाळा भेगडे आणि मावळ तालुक्याला अशोभनीय आहे.

आगामी काळात मावळच्या सर्वसामान्य जनतेचा विचार करुन प्रत्येकाला कशा पद्धतीने न्याय देता येईल, ही भूमिका घेऊन राजकारण करावे. मावळच्या जनतेने अजितदादांच्या रुपाने, मी करित असलेल्या कामावरील विश्वासाने मतरुपी आशिर्वाद दिला आहे. ग्रामीण भागातील जनतेला विकासकामात न्याय दिला पाहिजे. या मतामधून उतराई होण्यासाठी विजयी सदस्यांना पाच वर्षे जनतेची सेवा करावी लागेल. त्यांच्या अडचणी, सुख, दु:खात उभे राहण्याची सूचना आमदार सुनील शेळके यांनी विजयी उमेदवारांना केली.

## बारावीची परीक्षा आजपासून... गेल्यावर्षीपेक्षा विद्यार्थिसंख्येत वाढ...

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे आजपासून (१० फेब्रुवारी) राज्यभरात बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा बारावीच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सुमारे २७ हजारांनी वाढ झाली आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य काटेकोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत.**

### विभागीय मंडळनिहाय विद्यार्थिसंख्या

विभागीय मंडळनिहाय विद्यार्थिसंख्या अशी आहे : पुणे २ लाख ६० हजार १४, नागपूर १ लाख ६० हजार ५३०, छत्रपती संभाजीनगर १ लाख ९१ हजार ४९३, मुंबई ३ लाख ५२ हजार ७१८, कोल्हापूर १ लाख १६ हजार ६११, अमरावती १ लाख ५६ हजार ९१५, नाशिक १ लाख ७३ हजार ६५१, लातूर ९६ हजार ५४२ आणि कोकण २४ हजार १३.

शाखानिहाय विद्यार्थ्यांची संख्या अशी आहे : कला ३ लाख ८० हजार ६९२, वाणिज्य ३ लाख २० हजार १५२, विज्ञान ७ लाख ९९ हजार ७७३, व्यावसायिक अभ्यासक्रम २७ हजार ३७८ आणि आयटीआय ४ हजार ४९२.





राज्य मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा घेतली जात आहे. गेल्या वर्षी बारावी परीक्षेसाठी १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली, तसेच १८ तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

माहिती-तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जात आहे. माहिती-तंत्रज्ञान विषयासाठी २ लाख ३६ हजार ३२०, तर सामान्य ज्ञान विषयासाठी १ हजार ७०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

डॉ. बेडसे यांनी सांगितले की, एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी राज्य मंडळामार्फत प्रसिद्ध व छापील स्वरूपात जाहीर केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरावे. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात येत आहे. शिक्षण विभागाच्या ९ जानेवारीच्या शासननिर्णयानुसार परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरातील छायांकित प्रती (झेरॉक्स) दुकाने बंद ठेवण्यात आली असून, केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी जिल्हा दक्षता समितीची आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये अतिक्रमणांवर महापालिकेचा बुलडोझर!





## शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत धडक कारवाई

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या कालावधीपासून आतापर्यंत आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत एकूण १४३ अनाधिकृत बांधकामे, १ हजार २६० फ्लेक्स, १३ हजार ९७ केऑक्स, ११५ हातगाड्या, ६० टपऱ्या तसेच २ हजार ९९५ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य हटविण्यात व जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे (मुख्यालय) सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली.**

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाचे जवान तसेच पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकांचा समावेश होता.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक कालावधीत क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात आलेल्या अतिक्रमण कारवाईची आकडेवारी –

१) अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १३ अनाधिकृत बांधकामे हटविण्यात आली. यासोबतच ४८ फ्लेक्स, ३ हजार १२१ केऑक्स, ३७ हातगाड्या, ३५ टपऱ्या तसेच ४५२ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

> शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ व मोकळ्या जागांवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये. भविष्यातही नियमभंग करणाऱ्यांविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे. "शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि मोकळ्या जागांवरील अनधिकृत अतिक्रमण पूर्णपणे रोखणे हेच आमचे प्राथमिक लक्ष्य आहे. नियमभंग करणाऱ्यांविरोधात भविष्यातही अशीच काटेकोर कारवाई सुरू राहणार आहे, ज्यामुळे नागरिकांना सुरक्षित आणि सुव्यवस्थित शहराची सोय मिळेल."
>
> **– अतुल पाटील, सहाय्यक आयुक्त.**

२) ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २९ अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून ५५७ फ्लेक्स, ३ हजार ५ केऑक्स, ३ हातगाड्या तसेच ४८१ विविध साहित्य जप्त करण्यात आले.

३) क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २ अनाधिकृत बांधकामे, २७० फ्लेक्स, १ हजार ९३९ केऑक्स, २ हातगाड्या, १३ टपऱ्या व ४८९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

४) ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत अनाधिकृत बांधकाम आढळून आले नसले तरी ९६ फ्लेक्स, १ हजार २१५ केऑक्स, १५ हातगाड्या, १ टपरी व १९ इतर साहित्य हटविण्यात आले.

५) इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १ अनाधिकृत बांधकाम, ७१ फ्लेक्स, १ हजार २४१ केऑक्स, २० हातगाड्या, १ टपरी तसेच १ हजार ३१९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

६) फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ३५ अनाधिकृत बांधकामे, ६५ फ्लेक्स, ९६७ केऑक्स, १३ हातगाड्या, ३ टपऱ्या व ५७ इतर साहित्य हटविण्यात आले.

७) ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ११ अनाधिकृत बांधकामे, ८५ फ्लेक्स, ५१५ केऑक्स, २३ हातगाड्या, १ टपरी व ५२ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

८) ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ५२ अनाधिकृत बांधकामे, ६८ फ्लेक्स, १ हजार ९४ केऑक्स, २ हातगाड्या, ६ टपऱ्या व १२६ इतर साहित्य जप्त करण्यात आले.

---

# राष्ट्रीय नानचाकू स्पर्धेत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**उत्तर प्रदेशातील कानपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय नानचाकू स्पर्धा व पंच सेमिनार स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तिसरा क्रमांक मिळवला. स्पर्धेत देशभरातून सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.**



महाराष्ट्रातील खेळाडूंनी फ्री-स्टाइल, काथा आणि कुमिते या खेळ प्रकारांत चमकदार कामगिरी केली. एकांतिका रेड्डी, स्वरा हवळने, स्वरूप एकावडे, अयान शेख, स्वरूपा नामदे, आरुष मोरे, खुशी गुप्ता, अनन्या माने, तृप्ती वाडकर, जिक्रा खान, ओवी मालुसरे, आराध्या मालुसरे, सोहम मालुसरे, युवराज मालुसरे, शिवराज मालुसरे आणि आर्यन जोरवर यांनी पदके जिंकली.

दीपक शिर्के, स्वरूप एकवाडे, अनिल शिंदे, विजय कांबळे, रिदम तिवारी, स्वरा जाधव आणि अक्सा मुल्ला यांनी पंच परीक्षा पूर्ण केली. महाराष्ट्र नानचाकू संघाचे महासचिव दीपक शिर्के यांचे मार्गदर्शन मिळाले. नानचाकू असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. रोहित सक्सेना, अध्यक्ष संजय कपूर आणि महासचिव बाबूल वर्मा यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्राच्या संघाने शिस्तबद्ध खेळ, तांत्रिक कौशल्य आणि संयमाच्या जोरावर पदकतालिकेत मानाचे स्थान मिळवले. या यशामुळे राज्यातील नानचाकू खेळाडूंमध्ये नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. या यशाबद्दल खेळाडूंसह प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापनाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. भविष्यातील स्पर्धासाठी संघाकडून भरीव कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## भूमिका

**महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे निकाल हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांपुरते मर्यादित नसून, राज्याच्या आणि देशाच्या राजकारणाची दिशा ठरवणारे ठरले आहेत. महानगरपालिका, नगरपरिषदांनंतर आता ग्रामीण स्वराज्य संस्थांमध्येही भाजपने आपले वर्चस्व सिद्ध करत "पंचायत ते पार्लमेंट" हा प्रवास पूर्णत्वाकडे नेला आहे**

# भाजपाची विजयी घोडदौड



या विजयी घोडदौडीमागे एक नाव ठळकपणे पुढे येते—मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने केवळ निवडणुका जिंकल्या नाहीत, तर संघटन, रणनीती आणि प्रशासन यांचा समन्वय साधत राजकारणाला नवी दिशा दिली आहे. शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत पक्षाचा विस्तार हा योगायोग नसून, दीर्घकालीन नियोजनाचा परिणाम आहे. २०१७ चे सर्व रेकॉर्ड मोडणारे हे निकाल स्वतः मुख्यमंत्री फडणवीसांनी जाहीरपणे अधोरेखित केले असून, त्यातून भाजपाच्या वाढत्या जनाधाराची स्पष्ट साक्ष मिळते.

महायुतीचे स्थैर्य आणि परिपक्वता भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीने राज्यभरात सत्तेचा समतोल राखला आहे. विविध राजकीय प्रवाह, प्रादेशिक समीकरणे आणि स्थानिक नेतृत्व यांना एकत्र बांधण्याचे कसब फडणवीसांनी दाखवून दिले. पुणे जिल्ह्यात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आपला पारंपरिक गड राखला असला, तरी तेथेही भाजपा, शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार गटाची राष्ट्रवादी अशी महायुतीचीच सत्ता जिल्हा परिषद आणि पंचायत समितींमध्ये स्थापन झाली आहे. हे महायुतीतील परस्पर विश्वास आणि राजकीय परिपक्वतेचे उत्तम उदाहरण मानावे लागेल.

जनतेचा स्पष्ट कौल-राज्यभरात ५१ टक्क्यांहून अधिक मते भाजपाच्या पारड्यात पडणे हा केवळ आकडा नसून, तो जनतेच्या अपेक्षांचा कौल आहे. छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सिंधुदुर्ग, सांगली, सातारा, धाराशिव यांसारख्या जिल्ह्यांत भाजपाचा क्रमांक एकचा पक्ष ठरणे म्हणजे सरकारच्या कार्यपद्धतीला आणि नेतृत्वाला मिळालेली थेट मान्यता आहे. शहरी आणि ग्रामीण महाराष्ट्रातील मतदारांनी स्थैर्य, विकास आणि निर्णायक नेतृत्वाला पसंती दिल्याचे या निकालांतून स्पष्ट होते.

विरोधकांसाठी आत्मपरीक्षणाची वेळ. या निकालांनी महाविकास आघाडीसमोर अनेक प्रश्न उभे केले आहेत. अंतर्गत विसंवाद, दिशाहीन राजकारण आणि ठोस नेतृत्वाचा अभाव यामुळे आघाडीला पुन्हा एकदा जनतेचा विश्वास गमवावा लागला आहे. ग्रामीण भागात प्रभाव कमी होत जाणे हा इशारा गांभीर्याने घेण्याची गरज आहे, अन्यथा ही घसरण अधिक वेगाने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सत्तेची जबाबदारी तितकीच मोठ

आज भाजपाची सत्ता केंद्रात, राज्यात, महानगरपालिकांपासून जिल्हा परिषदांपर्यंत विस्तारलेली आहे. पंचायत ते पार्लमेंट असा राजकीय प्रवास पूर्ण झाल्यानंतर अपेक्षांचाही डोलारा मोठा झाला आहे. ही सत्ता केवळ राजकीय विजयापुरती मर्यादित न राहता, शाश्वत विकासाच्या दिशेने ठोस पावले टाकेल, अशी जनतेची अपेक्षा आहे. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचणे, ग्रामीण-शहरी दरी कमी करणे, शेतकरी, कामगार, महिला आणि युवकांना न्याय मिळणे हेच या सत्तेचे खरे यश ठरेल.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे निकाल हे स्पष्ट सांगतात की भाजपाची विजयी घोडदौड ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर जनतेने टाकलेली विश्वासाची मोहोर आहे. आता या व्यापक सत्तेला जबाबदारीची जोड देत, शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करणे आणि समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देणे हेच खरे आव्हान आहे. सत्ता सर्वत्र आहे आता अपेक्षा पूर्ण करण्याची वेळ आहे.

## प्रासंगिक »

### रूप नव्हे, बुद्धी महान

***हिंदू धर्मशास्त्रामध्ये अष्टावक्र नावाचे एक महान विचारवंत होऊन गेले. असे सांगितले जाते की अष्टावक्र ऋषी केवळ कुरूप नव्हते, तर त्यांचे शरीरही बेढब होते. त्यांच्या शरीराचे आठ ठिकाणी वाकडेपण होते, म्हणूनच त्यांना अष्टावक्र असे नाव पडले. ही कथा अतिशय प्रसिद्ध आहे.***

एकदा अष्टावक्र ऋषी राजा जनक यांच्या दरबारात गेले. दोन्ही बाजूंना उंच आसनांवर ज्ञानी, पंडित आणि सभासद बसले होते, तर मध्यभागी राजा जनकांचे सिंहासन होते. किशोरवयीन अष्टावक्र सभामंडपात प्रवेश करताच सर्वजण त्यांच्या रूपाकडे पाहून हसू लागले. हे लक्षात येताच अष्टावक्रही हसू लागले. राजा जनकांनी कारण विचारले असता अष्टावक्र म्हणाले की, "महाराज, मला वाटले इथे ज्ञानी लोक असतील; पण इथे बाह्य रूप पाहणारेच अधिक दिसतात." त्यांच्या या उत्तराने संपूर्ण सभा लज्जित झाली.

तात्पर्य –माणसाचे महत्व त्याच्या शरीरावर नाही तर त्याचे ज्ञान, परिश्रम आणि कर्मावर आहे.

महाराष्ट्राचे राजकारण नेहमीच देशाच्या राजकीय पटलावर केंद्रस्थानी राहिले आहे. 2014 ते 2019 या काळात राज्याने अस्थिरता, युती-फुटी आणि सत्तासंघर्षाचे अनेक टप्पे पाहिले. आश्चर्य म्हणजे, 2026 मध्ये पुन्हा एकदा त्याच काळाची आठवण करून देणारी परिस्थिती निर्माण झाली आहे

# राज्यात २०१४ ते २०१९ ची पुनरावृत्ती

अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या पोकळीमुळे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. त्याचवेळी, नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांतील भाजपच्या यशाने 2014 मधील मोदी लाटेची पुनरावृत्ती झाल्याचे चित्र दिसते.

2014 मध्ये शिवसेना-भाजप युती तुटल्यानंतर भाजप 122 जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र सत्तेसाठी आवश्यक संख्याबळ नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने 'स्थिरते'च्या नावाखाली भाजपला बाहेरून पाठिंबा दिला. या निर्णयाने शिवसेनेची ताकद कमी झाली, पण हा डाव पुढे राष्ट्रवादीसाठीच अंगलट आला. नंतर शिवसेना-भाजप पुन्हा एकत्र आले आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. विकासाच्या मुद्यावर सरकार चालले, मात्र अंतर्गत कलह, सेनेचे दबाव-राजकारण आणि राष्ट्रवादी-काँग्रेसचा विरोध यामुळे सरकार कायम अस्थिर राहिले.



2019 पर्यंत राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले. भाजप-शिवसेना युतीने लोकसभेत मोठे यश मिळवले, मात्र विधानसभेनंतर मुख्यमंत्रीपदाच्या वादामुळे युती तुटली. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत महाविकास आघाडी स्थापन केली. हे सरकार कोविड काळात टिकले, पण शिंदे गटाच्या फुटीनंतर ते कोसळले. त्यानंतर अजित पवारांच्या बंडाने विरोधकांचा पाया आणखी कमकुवत झाला.

28 जानेवारी 2026 रोजी अजित पवारांच्या अपघाती मृत्यूने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप घडवला. राष्ट्रवादीतील किंगमेकर हरपल्याने पक्षात नेतृत्वाचा प्रश्न उभा राहिला. शरद पवार गट आणि अजित पवार गटातील विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला. याच पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून त्या पुढे आल्या असल्या, तरी त्यांच्या नेतृत्वाची कसोटी आता सुरू झाली आहे.

दरम्यान, 2026 च्या महापालिका निवडणुकांत भाजपने शहरी भागात वर्चस्व सिद्ध केले. 29 महापालिकांपैकी 24 ठिकाणी महायुतीने सत्ता मिळवली. हा निकाल भाजपसाठी मोठा असला, तरी विरोधकांची कमजोरीही तितकीच ठळकपणे समोर आली. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), मनसे आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यासमोर पुढील साडेतीन वर्षांत स्वतःचे अस्तित्व मजबूत करण्याचे मोठे आव्हान आहे.

एकूणच, 2026 मध्ये महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा एकदा 2014-19 च्या वळणावर उभे असल्याचे चित्र दिसते—भाजप मजबूत, विरोधक विस्कळीत आणि नेतृत्वाच्या शोधात. पुढील काळात हे चित्र बदलते की अधिक गडद होते, हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणी जडों देसी ॥२॥
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘एमपीएससी’मार्फत २० हजार पदांची भरती, फडणवीस सरकारचा मोठा निर्णय...

## केरळ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर एमपीएससीमार्फत सरळसेवा भरती

**महाईन्यूज । नागपूर**

**सरळसेवा भरतीमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी सर्व परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घ्या अशी अनेक वर्षांपासूनची विद्यार्थी संघटनांची मागणी अखेर शासनाने मान्य केली आहे. गुरुवारी शासन निर्णय जाहीर झाले असून राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट- क संवर्गातील पदे २०२६ नंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणार आहेत. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: आग्रही आहे. काही दिवसांपूर्वी एमपीएससीकडूनही यासाठी हालचाली करण्यात आल्या.**




### असा आहे निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. राज्यात लवकरच नव्या पद्धतीने नोकर भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. सुमारे ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह प्रशासनातील सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच सचिव उपस्थित होते.

आयोगाकडून केरळ लोकसेवा आयोगाची तपासणी करण्यात आली. त्यानुसार एमपीएससीही सरळसेवा भरती घेणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ७० हजार पदांच्या भरतीची घोषणा केली. यातून २० हजार पदे ही एमपीएससीच्या माध्यमातून भरती जाणार आहेत. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी ही फार महत्त्वाची बातमी राहणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया कशी असेल, काय प्रकरण आहे ते पाहूया.

राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाने मांडलेले मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. भररती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

संपूर्ण भरती प्रक्रिया प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील. यात कोणत्याही विभागाने मागे न राहता सर्वांनी एकत्र येत प्रशासन सुधारणा यशस्वी कराव्यात, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# एसटी कामगार आक्रमक; १२ फेब्रुवारीपासून राज्यव्यापी आंदोलन

**महाईन्यूज । यवतमाळ**

**महायुती सरकारच्या काळात राज्यातील एसटी कामगारांवर अन्यायाचे सत्र सुरू असल्याची एस टी कर्मचाऱ्यांची भावना झाली आहे. कामगारांना सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाच्या हप्त्याची रक्कम देण्यास पुन्हा टाळाटाळ करण्यात येत असल्यामुळे एसटी महामंडळ आणि महायुती सरकारविरोधात प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. या महिन्यात फरकाची रक्कम न मिळाल्यास संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



येत्या फेब्रुवारीच्या वेतनात फरक हप्त्याची रक्कम अदा न केल्यास कामगारांच्या संतापाचा उद्रेक होईल, अशी आक्रमक भूमिका महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने घेतली असल्याचे औद्योगिक संबंध व प्रसिद्धी सचिव सदाशिव शिवणकर यांनी सांगितले. एसटी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १२ फेब्रुवारी रोजी आंदोलन छेडणार आल्याचीही माहिती त्यांनी दिली. जानेवारी महिन्याचे वेतन अदा करण्यासाठी वेतनाची रक्कम विभागांना वर्ग करण्यात आली. मात्र ती रक्कम फक्त नियमित वेतनासाठी असल्याचे नमूद करून त्यात सन २०२०-२४ मधील वेतनवाढ फरकाच्या ४८ हप्त्यांपैकीची रक्कम समाविष्ट नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे राज्यभरातील एसटी कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे.



वेतनवाढ फरकाची रक्कम अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. ती रक्कम मिळण्यासाठी कृती समितीच्या माध्यमातून संघर्ष करण्यात आला. त्यानंतर सरकारने फरकाचा हप्ता देण्याबाबत आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र टाळाटाळ सुरू आहे. त्यामुळे प्रशासन आणि सरकारच्या निर्णयाविरोधात राज्यभरातील एसटी कर्मचारी तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

अहोरात्र काबाडकष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कष्टाच्या प्रमाणात मोल दिले जात नाही. हा कामगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. विविध महामार्ग बांधणीचे प्रकल्प असोत किंवा लाडकी बहीण योजना असो या बाबींसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी राज्यकर्त्यांची भूमिका असते. त्यात एसटी कर्मचारी समाविष्ट नसावेत ही शोकांतिका असल्याचे सदाशिव शिवणकर म्हणाले.

एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या घामाचे दाम नियमितपणे अदा होणे आवश्यक आहे. फेब्रुवारीच्या वेतनामध्ये फरकाच्या हप्त्याची रक्कम अदा न झाल्यास कामगारांच्या भावनांचा विस्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य परिणामांची शक्यता लक्षात घेत फेब्रुवारीच्या वेतनामध्ये ‘फरक हप्त्या’चा समावेश करून वेतन अदा करण्याबाबत तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे औद्योगिक संबंध व प्रसिद्धी सचिव सदाशिव शिवणकर यांनी केली आहे.

# लॅम्बोर्गिनीचा नरसंहार; रस्त्यावर मृत्यू

## भरधाव लॅम्बोर्गिनीच्या धडकेत अनेक गंभीर जखमी; घटनेनं शहर हादरलं

**महाईन्यूज । उत्तर प्रदेश**

**श्रीमंतांच्या मुलांनी महागड्या, आलिशान गाड्या बेदरकारपणे चालवून रस्त्यांवर सामान्यांना चिरडल्याच्या अनेक घटना आजवर घडल्या आहेत. रविवारी यात कानपूरचीही भर पडली. कानपूरच्या व्हीआयपी रस्त्यावर प्रसिद्ध तंबाखू व्यापारी केके मिश्रा यांच्या मुलाने बेदरकारपणे गाडी चालवून सहा जणांना उडवले. शिवम मिश्रा असे या मुलाचे नाव असून तो नशेत असल्याची माहिती आता समोर आली आहे.**



रविवारी दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास शिवम मिश्रा आलिशान लॅम्बोर्गिनी गाडी भरधाव वेगाने चालवत ग्वाल्टोली परिसरातील रेव्ह – ३ मॉलजवळ आला. तिथे त्याने एका ऑटो-रिक्षाला धडक दिली. तसेच रस्त्यांवर उभ्या असलेल्या दुचाकी आणि पादचाऱ्यांना उडवत तो पुढे निघून गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी गाडी शिवम मिश्राच चालवत होता.

पोलीस उपायुक्त अतुल कुमार श्रीवास्तव यांनी या प्रकरणावर माहिती देताना सांगितले की, रविवारी दुपारी ही दुर्घटना घडली. शिवम मिश्रा गाडी चालवत असताना त्याचे नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनेक गाड्यांना, दुचाकींना आणि पादचाऱ्यांना त्याने धडक दिली. यामुळे या परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण होते.

बंशीधर कंपनीने त्यांचे वार्षिक उत्पन्न २० ते २५ कोटी असल्याचे जाहीर केले होते. मात्र कंपनीची प्रत्यक्ष उलाढाल १०० ते १५० कोटींच्या घरात असल्याची माहिती समोर आली होती. प्राप्तिकर विभागाच्या धाडीत कार्यालयातून सुरुवातीला ४.५ कोटी रुपयांची रोकड मिळाली होती. त्यानंतर पुन्हा इतरत्र मारलेल्या धाडीत ७ कोटींची रोकड, सोन्या-चांदीचे दागिने ज्याची किंमत २.५ कोटी रुपये असल्याचे सांगितले गेले.

### आलिशान गाड्यांचा संग्रह

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, शिवम मिश्रा दिल्लीतील वसंत विहारसारख्या उच्चभ्रू परिसरात आलिशान जीवनशैली जगतो. महागडे बंगले, पार्ट्या आणि लक्झरी गाड्यांचा शौक यामुळे तो ओळखला जातो. शिवमकडे सुमारे ५० कोटी रुपयांच्या आलिशान गाड्यांचा संग्रह असून, लॅम्बोर्गिनी, फेरारीसारख्या महागड्या सुपरकार्स त्यात समाविष्ट असल्याची माहिती आहे.

विशेष म्हणजे या सर्व गाड्यांवर '४०१८' हा एकच समान नंबर वापरण्यात आला आहे, ज्यामुळे तो अनेकदा सोशल मीडियावर आणि चर्चांमध्येही झळकला आहे.

आलिशान जीवनशैली आणि वादग्रस्त पार्श्वभूमी यामुळे शिवम मिश्रा याचं नाव पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आलं आहे.

### कोण आहे शिवम मिश्रा?

शिवम हा उत्तर प्रदेशातील प्रसिद्ध तंबाखू व्यावसायिक के.के. मिश्रा यांचा मुलगा आहे.२०२४ मध्ये प्राप्तीकर विभागाने बंशीधर एक्सपोर्ट्स प्रा. लि. विरोधात चौकशी सुरू केल्यानंतर तो पहिल्यांदा चर्चेत आला होता. हा तपास पुढे केवळ एका शहरापुरता मर्यादित न राहता संपूर्ण उत्तर प्रदेशात पसरला, त्यानंतर कानपूर, मुंबई, दिल्ली आणि गुजरातमधील कार्यालयांवरही चौकशीची व्याप्ती वाढवण्यात आली होती.

# सिंगापूरमध्ये कबुतरांना खायला टाकणं भारतीय महिलेला भोवलं..!

**महाईन्यूज । सिंगापूर**

**सिंगापूरमध्ये कबुतरांना रस्त्यावर खायला टाकणं भारतीय वंशाच्या महिलेला चांगलंच भोवलं आहे. ७१ वर्षीय महिलेला कोर्टाने दोन लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. कबुतरांना रस्त्यावर खायला टाकण्यावरुन प्रशासनाकडून महिलेला वारंवार बजावण्यात आले होते.**

**पण, सूचना देऊन देखील तिने कबुतरांना खायला टाकण्यास बंद न केल्याने तिच्यावर खटला चालवून दंड ठोठावण्यात आला.**



सन्मूगामनाथन शामला (७१) असे या भारतीय वंशाच्या महिलेचे नाव आहे. सिंगापूर वन्यजीव कायद्यानुसार महिलेला दोन लाख २६ हजार रुपये (३,२०० सिंगापूर डॉलर) एवढा दंड ठोठावण्यात आला आहे. महिलेला दंडा ठोठवताना तिच्यावरील पूर्वीचे पाच गुन्हे देखील विचारात घेण्यात आले आहेत. याबाबतचे वृत्त न्यूज आशियाने प्रसिद्ध केले आहे.

कोर्टाने नोंदवलेल्या निरीक्षणानुसार, शामला या गेल्या सहा महिन्यांपासून त्यांच्या घराजवळील परिसरात कबुतरांना खायला टाकत आहेत. महिलेने या प्रकारचा गुन्हा यापूर्वी देखील केला आहे. मे २०२५ मध्ये याप्रकरणी महिलेला १,२०० सिंगापूर डॉलर रुपये दंड ठोठावण्यात आला होता. महिलेविरोधात वन्य पक्षांना खायला टाकणे आणि राष्ट्रीय उद्यान मंडळाच्या कबुतरखाना मोहिमेत हस्तक्षेप केल्याचा आरोप तिच्याविरोधात करण्यात आला.

### दंड कमी करण्याची विनंती

शामला स्वत:च कोर्टात बाजू मांडली. महिलेने तिच्याकडे रोजगार आणि विमाही नसल्याचे कोर्टात सांगितले. दंडाची रक्कम १ ते दोन हजार सिंगापूर डॉलर एवढी होईल का? अशीही विनंती केली. दंडाच्या बदल्यात सामाजिक कार्य अथवा सेवा करेन अशी विनंती महिलेने कोर्टाकडे केली. सिंगापूर वन्यजीव कायद्यानुसार वारंवार सूचना देऊन देखील जाणीवपूर्वक कोणी पक्षांना खायला टाकत असेल तर, प्रत्येक तक्रारीवर संबंधित व्यक्तीला १० हजार सिंगापूर डॉलर एवढा दंड भरावा लागतो.

### सूचना देऊनही वारंवार गुन्हा

यानंतर देखील महिला या भागातच कबुतरांना खायला टाकत असल्याचे दिसून आले. रस्त्यावर महिला धान्य आणि ब्रेडचे तुकडे टाकत असल्याचे अधिकाऱ्यांनी पाहिले होते. महिलेविरोधात दाखल करण्यात आलेल्या आरोपत्रानुसार, महिला रात्रीच्या वेळेत घराजवळीत भागात कबुतरांना खायला टाकत असल्याचे दिसून आले आहे. सुनावणी सुरु असताना महिलेने तिच्याविरोधातील आरोप फेटाळून लावत पुरावा मागितला. यावेळी कोर्टात चार व्हिडिओ पुरावे सादर करण्यात आले. कबुतरांना खायला टाकत असतान महिला तिथेच उभी असल्याचे व्हिडिओत दिसत आहे.

### तीनच दिवसांत पुन्हा केली चूक

महिला हाच गुन्हा वारंवार करत आहे. महिला कायद्याचे वारंवार उल्लंघन करत आहे, असे कोर्टात सरकारी वकिलांनी बाजू मांडताना म्हटले. महिलेने यापूर्वी दिलेल्या सूचनेनंतर पुन्हा अशी चूक करणार नाही, अशी हमी दिली होती. पण, यानंतर तीनच दिवसात महिला पुन्हा कबुतरांना खायला टाकताना दिसून आली.

## तृप्तीचा नजरेत भरणारा लूक



ओ'रोमिओ मधील तृप्ती दिमरीचा नवीन लूक रिलीज झाला असून तो साधा असला तरी भावनिक आणि नजरेत भरणारा आहे. 'प्रेम हा अफशानवर पडलेला शाप आहे' या संवादामुळे तिच्या व्यक्तिरेखेची वेदना आणि खोली अधिक ठळकपणे समोर येत आहे. ओ'रोमिओ हा २०२६ मधील सर्वाधिक चर्चेत असलेला चित्रपट ठरतोय. विशाल भारद्वाज दिग्दर्शित रोमँटिक क्राईम थ्रिलर चित्रपटातील तृप्ती डिमरीचा नवा लूक व्हायरल होतोय. नाडियाडवाला ग्रँडसन एंटरटेनमेंटने इन्स्टाग्राम हँडलवर तृप्तीचा नवा लूक शेअर केला आहे. यामध्ये अभिनेत्री तृप्तीने ब्लॅक कलर दुपट्टा डोक्यावर ओढलेला दिसतो. खूप कमी सिंपल लूकमध्ये ती लक्षवेधी ठरलीय. फोटो शेयर करत निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलंय, "मोहब्बत एक बद्दुआ है जो अफशां को लगी है.... साजिद नाडियाडवाला प्रस्तुत करते हैं विशाल भारद्वाज की फिल्म 'ओ रोमियो' इस शुक्रवार सिनेमाघरों में." तृप्तीने इन्स्टाग्रामवर लिहिलंय- 'ती मनापासून भावना व्यक्त करते आणि तीव्रतेने संघर्ष करते.... ४ दिवसांनी अफशानला भेटा'. हा चित्रपट १३ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहांत रिलीज होणार आहे. विशाल भारद्वाज आणि शाहिद कपूर यांचा हा चौथा चित्रपट आहे. या जोडीने आधी 'हैदर' आणि 'कमीने' चित्रपट एकत्र केले आहेत.

## राखी सावंतची वाइल्ड कार्ड एण्ट्री




ड्रामा, धक्का आणि धमाका! या तीन शब्दांची एकच ओळख म्हणजेच... हो तीच... आता आली एंटरटेनमेंटची लहर. बिग बॉस मराठीच्या घरात पसरणार एंटरटेनमेंटचा कहर. बिग बॉस मराठी सीझन 6मध्ये पहिली वाइल्ड कार्ड स्पर्धक राखी सावंतची एण्ट्री होणार आहे. राखी सावंत घरात पूर्ण एंटरटेन्मेंटची त्सुनामी घेऊन येणार आहे. आतापर्यंत तयार झालेली समीकरणं, नाती, गटबाजी आणि समज-गैरसमज, सर्व गोष्टींवर राखीचा एकच प्रश्नचिन्ह! तिच्या आगमनाने घरातल्या प्रत्येक सदस्याचा गेम हादरणार हे नक्की. कोणाशी मैत्री, कोणाशी वाद, कोणाच्या नाड्या आवळायच्या आणि कोणाला भावनिकरित्या गोंजारायचं हे सर्वकाही राखीच्या खेळात नेहमीच अनपेक्षित असतं. राखी सावंतच्या एण्ट्रीमुळे महाराष्ट्राला एन्टरटेन्मेंटचा भारी डोस मिळणार आहे. घरामध्ये एण्ट्री करण्यापूर्वी राखी सावंत म्हणाली की, "राखी जाणार आणि गेम पालटणार. माझ्याशिवाय बिग बॉस अधुरं आहे. मी घरात गेल्यावर सगळ्यांचा आवाज गायब होतो. जेव्हा राखी सावंत घरात जाणार तिची मर्जी चालणार आहे. मी घरात धम्माल करणार आहे. तुम्हाला माझे वेगवेगळे COSTUMES, माझा गेम पहायला मिळणार आहे. बिग बॉस प्लॅटफॉर्म सगळ्यांना नाही मिळत आपल्याला मिळाला आहे तर त्याचा उपयोग करून घ्या, हे माझं म्हणणं आहे. रितेश देशमुख अमेझिंग आहेत आणि उत्तम अभिनेते आहेत. संपूर्ण महाराष्ट्रमध्ये आपला बिग बॉस मराठी चालतो आहे, मला खूप अभिमान आहे, ते हा शो होस्ट करत आहेत. आपल्या मराठी लोकांसाठी आणि महाराष्ट्रासाठी मी बिग बॉस मराठी करत आहे."

## 'ही' अभिनेत्री पतीपासून राहतेय वेगळी?



बिग बॉस, बिग बॉस मराठी, मास्टरशेफ इंडिया, लाफ्टर शेफ, खतरों के खिलाडी, स्प्लिट्सव्हिला, रोडीज, असे विविध रिॲलिटी शो पाहायला मिळतात. या रिॲलिटी शोमधून सहभागी झालेल्या स्पर्धकांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अधिक जाणून घेता येते. काही रिॲलिटी शोमध्ये टास्क दिले जातात. ते टास्क जर ठरवून दिलेल्या नियमांनुसार पूर्ण केले तर तो स्पर्धक पुढे जातो. तर बिग बॉससारख्या शोमध्ये काही स्पर्धक काही ठरावीक कालावधीसाठी एकत्र राहतात. प्रेक्षकांना जे स्पर्धक आवडतील, त्या स्पर्धकांना प्रेक्षक व्होट करतात. ज्या स्पर्धकाला सर्वांत कमी व्होट मिळतात, त्या स्पर्धकाला घराबाहेरचा रस्ता धरावा लागतो. आता या रिॲलिटी शोमध्ये आणखी एका शोची भर पडली आहे. 'द ५०' असे या शोचे नाव आहे. या शोमध्ये ५० स्पर्धक सहभागी झाले होते. त्यातील काही स्पर्धक या शोमधून बाहेर पडले आहेत. दिव्या अग्रवालदेखील या शोमध्ये सहभागी झाली आहे. आता एका भांडणात तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल एका स्पर्धकाने वक्तव्य केले आहे. दिव्याचे अर्चना गौतम आणि भव्या सिंग यांच्याबरोबर भांडण झाले. या भांडणात भव्या सिंगने दिव्याला गोल्ड डिगर आहे. इतकेच नाही, तर दिव्या तिच्या नवऱ्याबरोबर राहत नाही, असेही सांगितले. शोमध्ये बैल अँड बुद्धी हा टास्क देण्यात आला होता. या टास्कमध्ये दिव्या आणि अर्चनाचे भांडण झाले. अर्चनाला डोकं नाही, असे दिव्या म्हणाली. अर्चनाबरोबर चांगले बॉण्डिंग असलेल्या भव्याला दिव्याचे वागणे आवडले नाही. दिव्या वॉशरूममध्ये रडत होती. त्यावेळी भव्याने तिला टिश्यू देण्यास नकार दिला. त्यानंतर सपना चौधरी आणि आर्याबरोबर बोलताना भव्याने दिव्याच्या वैयक्तिक आयुष्यावर वक्तव्य केले. ती म्हणाली की, ती फेक आहे. लोक तिला गोल्ड डिगर म्हणतात, यामध्ये काही आश्चर्य नाही. पुढे ती असेही म्हणाली, "दिवाळीला खरे फटाके तर हिच्या घरी फुटले होते, जे मीच फोडले होते. ती तिच्या पतीपासून वेगळी राहते. मुंबईत लोकांकडे भीक मागते की माझ्या घरी राहायला या. मला भेटा. ती तिच्या नवऱ्याबरोबर राहत नाही. दिव्याने फेब्रुवारी २०२४ मध्ये उद्योगपती अपूर्व पाडगांवकर यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली होती. मुंबईत पारंपरिक मराठी पद्धतीने हा विवाहसोहळा पार पडला होता. त्याच वर्षी मे महिन्यात दोघांच्या विभक्त होण्याबाबतच्या चर्चांना ऊत आला होता. मात्र, दिव्याने त्या चर्चा अफवा असल्याचे सांगून फेटाळून लावल्या होत्या.

## 'धुरंधर'च्या यशामागे संघाचं 'व्हिस्परिंग'



धुरंधर हा चित्रपट ३० जानेवारीला नेटफ्लिक्सवर रिलीज झाला. जे लोक थिएटरला जाऊन हा चित्रपट पाहू शकले नाहीत, ते ओटीटीवर हा चित्रपट पाहतायत. ओटीटीवर रिलीज झाल्यानंतर 'धुरंधर' नेटफ्लिक्सवर ट्रेंड होत आहे. 'धुरंधर'चं प्रेक्षकांनी आणि इंडस्ट्रीतल्या कलाकारांनी भरभरून कौतुक केलं. काही जण अजूनही कौतुक करतायत. अशातच 'धुरंधर'च्या यशाबद्दल सरसंघचालक मोहन भागवत यांनीसुद्धा प्रतिक्रिया दिली आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'धुरंधर'च्या यशाबद्दल प्रतिक्रिया दिली. 'धुरंधर'च्या यशामागे संघाचं 'व्हिस्परिंग' असल्याचं मोहन भागवत यांनी म्हटलं. 'धुरंधर'सारखे सिनेमे अजून बनले पाहिजेत, यासाठी संघ आणि सरकार काय करू शकतं, या प्रश्नावर सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, "असे जे सिनेमे आले आहेत, ज्याचा व्हिस्परिंगद्वारे स्वयंसेवकांनी प्रचार केला आहे. एक जण बघतो आणि तो अनेकांना सांगतो की 'हा सिनेमा बघा'. याचा सिनेमांना अप्रत्यक्षरीत्या फायदा होतोच. त्यामुळे आता लोक वाट बघत आहेत की, पुढे कुठला सिनेमा येणार..." त्यानंतर ते म्हणाले, "समाजात असं एक वातावरण तयार झालं आहे. त्यामुळे असे सिनेमे बनतात तेव्हा ते चालतात. सिनेमे म्हणून चालण्यात संघाच्या स्वयंसेवकांचंसुद्धा योगदान आहे. कधी शाखांमधून स्वयंसेवकांना असे सिनेमे दाखवण्यासाठी नेलं जातं. ५०० लोक आले, तर किती कन्सेशन मिळणार अशा चर्चासुद्धा होतात. संघ हे काही प्लॅनिंगने करत नाही. स्वयंसेवकांच्या मनात राष्ट्राविषयीच्या ज्या भावना आहेत, त्या सिनेमात दाखवल्या गेल्या आहेत, असं वाटतं. म्हणून सगळे मिळून सिनेमे बघतात, हे सगळं आपोआप होतं."

# भारत-पाकिस्तान सामना होणार

## ICC च्या तंबीनंतर पाकिस्तान वठणीवर! बहिष्कारावरुन यु-टर्न

महाईन्यूज । मुंबई

**पाकिस्तानने भारताविरोधातील सामन्यावर बहिष्कार टाकल्यानंतर आता यु-टर्न घेतला आहे. आयसीसीसोबत झालेल्या बैठकीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने माघार घेतली आहे. त्यामुळे आता नियोजित वेळापत्रकानुसार, 15 फेब्रुवारीला भारत-पाकिस्तान सामना होणार आहे. बांगलादेशने भारतात खेळण्यास नकार देत, त्यांचे सामने श्रीलंकेत खेळण्याची मागणी केली होती. आयसीसीने ही मागणी फेटाळल्यानंतर त्यांनी टी-20 खेळण्यास नकार दिला होता. यानंतर पाकिस्तानने बांगलादेशला समर्थन जाहीर करत भारताविरोधातील सामन्यावर बहिष्कार टाकला होता.**



आयसीसीने पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्याशी सल्लामसलत करून बोर्डाची भूमिका निश्चित करण्यासाठी एक दिवसाची मुदत देण्यात आली होती.

रविवारी पाच तासांहून अधिक काळ चाललेल्या या बैठकीला पाकिस्तानचे गृहमंत्री असलेले मोहसिन नक्वी आणि आयसीसीचे उपाध्यक्ष इम्रान ख्वाजा उपस्थित होते. विशेष म्हणजे, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (BCB) आपले सामने खेळण्यासाठी भारतात जाण्यास नकार दिल्यानंतर, टी-20 विश्वचषकातून बांगलादेशला वगळण्याच्या विरोधात मतदान करणारा पाकिस्तान हा एकमेव सदस्य देश ठरला होता. यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल हेदेखील चर्चेत सहभागी होण्यासाठी लाहोरला गेले होते.

पाकिस्तान सरकारने 1 फेब्रुवारी रोजी सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये आपल्या वरिष्ठ राष्ट्रीय संघाला



टी-20 विश्वचषकात भारताविरुद्ध खेळण्याची परवानगी नाकारली. तथापि, पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी नंतर स्पष्ट केलं की, हा निर्णय बांगलादेशला पाठिंबा दर्शवण्यासाठी घेण्यात आला होता आणि त्यांनी आयसीसीवर पक्षपाताचा आरोप केला.

### आयसीसीने फेटाळल्या पाकिस्तानच्या मागण्या

रविवारी झालेल्या बैठकीत टी-20 विश्वचषक सामन्यावर बहिष्कार टाकण्याच्या भूमिकेवरुन पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेसमोर अनेक मागण्या मांडल्या . आयसीसीने त्यापैकी तीन मागण्या फेटाळून लावल्या आहेत, ज्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय क्रिकेट पुन्हा सुरू करण्याचा आणि बांगलादेश, पाकिस्तान व भारत यांचा समावेश असलेल्या तिरंगी मालिकेचा प्रस्तावांचा समावेश होता.

# क्रिकेटपटू रिंकू सिंग–प्रिया सरोज यांच्या लग्नाचा मुहूर्त निश्चित

महाईन्यूज । मुंबई

**भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज रिंकू सिंग मैदानातील कामगिरीशिवाय वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीमुळे चर्चेत आहे. क्रिकेटर रिंकू आणि उत्तर प्रदेशातील समाजवादी पक्षाच्या खासदार प्रिया सरोज यांच्या लग्नाचा मुहूर्त कधी? यासंदर्भातील माहिती समोर येत आहे.**



आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या व्यस्त वेळापत्रकामुळे लग्नाची तारीख याआधी अनेकदा पुढे ढकलण्यात आली होती, मात्र आता कुटुंबीयांनी जून महिन्याची तारीख अंतिम केली आहे. IPL स्पर्धेसह क्रिकेट हंगाम संपल्यानंतरच विवाह करण्याचा निर्णय घेण्यात आला, जेणेकरून रिंकूला कुटुंबासाठी पुरेसा वेळ देता येईल, अशी माहिती समोर आली आहे.

रिंकू सिंगचा मोठा भाऊ सोनू सिंग यांने दिलेल्या माहितीनुसार, विवाहसोहळा नेमका कुठे होणार याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल. सध्या लखनऊ आणि वाराणसी या ठिकाणांचा विचार करण्यात येत आहे. अलीगड येथे भव्य रिसेप्शन आयोजित करण्याचा प्लॅनही आखण्यात येत असल्याची माहिती रिंकूच्या भावाने दिली आहे. साखरपुड्यानंतर सुरुवातीला लग्नाची तारीख १८ नोव्हेंबर २०२५ ठरवण्यात आली होती, मात्र व्यस्त क्रिकेट वेळापत्रकामुळे ती पुढे ढकलण्यात आली. रिंकू सिंग आणि प्रिया सरोज यांचा साखरपुडा ८ जून २०२५ रोजी लखनऊमध्ये पार पडला होता. राजकारण आणि क्रीडा क्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा विशेष चर्चेत राहिला.

रिंकू सिंह हा IPL मधील केकेआरच्या संघाकडून खेळताना लोकप्रिय झाला. KKR संघाचा मालक शाहरुख खान याने तर थेट तुझ्या लग्नात मी नाचायला येईन, असे म्हटले होते. ही गोष्टही चांगलीच चर्चेत राहिली. त्यामुळे क्रिकेटरच्या लग्नात झुमे जो पठाण शो पाहायला मिळणार का? ते पाहण्याजोगे असेल.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। मंगळवार ।
दि. 10 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# महापालिका शहर अभियंत पदासाठी रस्सीखेच

## मकरंद निकम यांच्या निवृत्तीनंतर पदासाठी तीन अधिकाऱ्यांमध्ये चुरस



**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**महापालिका शहर अभियंता मकरंद निकम यांचा स्वेच्छानिवृत्ती अर्ज आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मंजूर केला आहे. त्यानुसार २८ फेब्रुवारी रोजी निकम कार्यमुक्त होत आहेत. त्यामुळे शहर अभियंतापदी कोण? अशी चर्चा सुरू आहे. सद्यःस्थितीत तीन अधिकाऱ्यांमध्ये रस्सीखेच सुरू असून, शहर अभियंतापदाची कोणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, बांधकामे अशा विविध विकास कामांच्या तांत्रिक विभागाचे प्रमुख म्हणून महापालिकेतील शहर अभियंतापद प्रतिष्ठेचे आणि अतिमहत्त्वाचे आहे. त्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी (सिव्हिल इंजिनिअर) शाखेची पदवी अत्यावश्यक असते. शिवाय, महापालिका सेवेतील अभियंत्यांची सेवाज्येष्ठतेनुसार शहर अभियंता पदावर वर्णी लागते. विशेषतः सहशहर अभियंतापदी कार्यरत अधिकाऱ्यालाच पदोन्नती देऊन शहर अभियंतापदी नियुक्ती केली जाते. विद्यमान शहर अभियंता मकरंद निकम यांनी तीन महिन्यांपूर्वी वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ती मिळविण्यासाठी प्रशासन अर्थात आयुक्तांकडे अर्ज केला होता. त्यास आयुक्तांनी मंजुरी दिली असून, त्यांना २८ फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यमुक्त केले जाणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये शहर अभियंतापदी नियुक्तीसाठी चुरस निर्माण झाली आहे.

### शहर अभियंत्याचे अधिकार-कर्तव्ये

- बांधकाम परवानगी व विकास : नियमानुसार वाढीव एफएसआय किंवा उंची मान्य करणे आणि घरमालकांना दुरुस्ती परवानगी देणे
- अनधिकृत बांधकाम नियंत्रण : शहरात होणाऱ्या बेकायदेशीर बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, अतिक्रमण काढणे, तक्रारींचे निराकरण करणे
- पायाभूत सुविधांची देखभाल : शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक इमारतींची बांधकामे व दुरुस्ती करणे
- तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण : कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंत्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून कामांची पाहणी करणे
- निविदा प्रक्रिया : शहराच्या विकास कामांसाठी निविदा मागवणे, छाननी करणे आणि कंत्राटदारांना कामे वाटप करणे
- न्यायालयीन बाबी : महापालिकेच्या बांधकाम विभागाशी संबंधित प्रकरणांत कनिष्ठ न्यायालयात जबाब देणे, साक्षी दाखल करणे

### तीन अधिकारी पण..

महापालिका शहर अभियंतापदी सहशहर अभियंता पदावरील अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती केली जाते. मात्र, चार वर्षांपूर्वी शहर अभियंतापदाला समांतर मुख्य अभियंता पदाला सरकारने मंजुरी दिली आहे. त्यापदांवर सहशहर अभियंता पदावरील व्यक्तीलाच पदोन्नती दिली जाते. त्यामुळे सेवाज्येष्ठतेनुसार प्रमोद ओंभासे व संजय कुलकर्णी यांची मुख्य अभियंतापदी वर्णी लागली आहे. सद्यःस्थितीत सहशहर अभियंतापदी मनोज सेठिया कार्यरत आहेत. त्यांच्यासह अन्य अधिकारीही शहर अभियंतापदासाठी स्पर्धेत आहेत.

> महापालिका सेवेतील सहशहर अभियंता पदावरील व्यक्तीची शहर अभियंतापदावर पदोन्नतीने नियुक्ती केली जाते. आताच्या नियुक्ती संदर्भात आयुक्तांशी चर्चा केली जाणार आहे.
>
> **- मनोज लोणकर,** उपआयुक्त, प्रशासन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# शुभेच्छांसाठी हार-पुष्पगुच्छ नको; रवि लांडगे

## भेट द्यावयाच्याच असल्यास विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य द्या!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महापौर पदाच्या शुभेच्छा देताना कुणीही हार, पुष्पगुच्छ अथवा अन्य भेटवस्तू घेऊन येऊ नयेत. त्याऐवजी द्यावयाच्याच असल्यास महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य म्हणून उपयोगी ठरेल अशी पुस्तके, वह्या, लेखन साहित्य किंवा अन्य शैक्षणिक वस्तू शुभेच्छा अथवा भेटीच्या वेळी आणाव्यात, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.**





महापौर रवी लांडगे हे नुकतेच दोन दिवसीय वरिष्ठ नेत्यांच्या भेटी व दौऱ्यावर होते. या कालावधीत शहरातील नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेता न आल्याबद्दल त्यांनी नागरिकांची दिलगिरी देखील व्यक्त केली. हार-पुष्पगुच्छ क्षणिक सन्मानाचे प्रतीक असले, तरी विद्यार्थ्यांसाठी दिलेले शैक्षणिक साहित्य त्यांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरते, असे महापौर रवि लांडगे यांनी बोलताना सांगितले. या उपक्रमातून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट शैक्षणिक मदत मिळणार असून, शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत साधनांची पूर्तता होण्यास हातभार लागणार आहे. औपचारिक शुभेच्छांऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संदेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बळ वाढावे, त्यांना आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे आणि समाजामध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असेही महापौर लांडगे यांनी आवाहन केले आहे.

> महापौर पदाच्या शुभेच्छा म्हणजे केवळ हार-पुष्पगुच्छांचा औपचारिक सन्मान नसून, त्या शुभेच्छा जर समाजाच्या उज्वल भविष्यासाठी उपयोगी ठरल्या तर त्याला खरा अर्थ प्राप्त होतो. विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तके, वह्या व शैक्षणिक साहित्य देणे म्हणजे त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात थेट हातभार लावणे होय. आज दिलेले हे छोटे योगदान उद्याच्या सक्षम, सुजाण आणि जबाबदार नागरिकांची पायाभरणी करेल. नागरिकांनी सामाजिक भान ठेवून शिक्षणाला प्राधान्य द्यावे, हाच या उपक्रमामागील माझा प्रामाणिक उद्देश आहे.
>
> – रवि लांडगे, **महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# 'बेस्ट कॅडेट' तनु भानने देशपातळीवर घडवला इतिहास!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या परेडनंतर राजधानी दिल्लीतील CARIAPPA PARADE GROUND येथे पार पडलेल्या राष्ट्रीय एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या कन्येने देशपातळीवर आपला ठसा उमटवला आहे. महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने आर्मी विंग (सीनियर विंग) मधून देशातील सर्वोच्च 'बेस्ट कॅडेट' हा मानाचा किताब पटकावत महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवला आहे.**





एका दिमाखदार सोहळ्यात भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तनु भान हिला सुवर्णपदक आणि मानाची केन प्रदान करून गौरविण्यात आले. शिस्त, नेतृत्वगुण, शारीरिक क्षमता, आत्मविश्वास आणि राष्ट्रसेवेची भावना या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत तिने हा सन्मान मिळवला.

विशेष म्हणजे तनु भान ही पिंपळे सौदागर येथील रहिवासी असून, तिच्या या यशामुळे केवळ तिच्या प्रभागाचेच नव्हे तर संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचे आणि महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर उज्वल झाले आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक श्री शत्रुघ्न (बापू) काटे यांनी तनु भान आणि तिच्या कुटुंबीयांची भेट घेऊन तिचा विशेष सन्मान केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना श्री काटे म्हणाले की, "तनु भान हिने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर केवळ पिंपळे सौदागरच नव्हे तर संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचा आणि महाराष्ट्राचा मान देशपातळीवर उंचावला आहे. हे यश केवळ वैयक्तिक नसून महाराष्ट्रातील मुलींच्या क्षमतेचे आणि देशातील महिलाशक्तीचे तेजस्वी उदाहरण आहे. शिस्त, परिश्रम आणि देशभक्तीच्या बळावर मुली कोणतेही शिखर सर करू शकतात, हा प्रेरणादायी संदेश तनुने संपूर्ण देशाला दिला आहे." महिलाशक्ती, जिद्द आणि नेतृत्वाचे प्रतीक ठरलेली तनु भान आज हजारो तरुणींसाठी प्रेरणास्थान बनली आहे. राष्ट्रसेवेच्या क्षेत्रात मुली कोणत्याही बाबतीत कमी नाहीत, हे तिने आपल्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. याप्रसंगी श्री विनोद पाटील, तनु भान यांचे कुटुंबीय तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

> तनु भानसारख्या कर्तृत्ववान मुलींना पुढे नेण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका व सामाजिक स्तरावर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. शहरातील मुलींसाठी शैक्षणिक, क्रीडा आणि राष्ट्रसेवेच्या संधी अधिक व्यापक करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. तनुच्या यशातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक मुली देशसेवेच्या प्रवाहात सहभागी व्हाव्यात, यासाठी आवश्यक त्या सुविधा आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील.
>
> – शत्रुघ्न काटे, **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड शहर, पुणे.**

# ऊर्जा स्वयंपूर्णतेकडे गृहनिर्माण सोसायट्यांचे ठोस पाऊल

## पुनावळेतील सोसायटीत ५७५ किलोवॅट सौर प्रकल्पाचे लोकार्पण

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमध्ये शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक धोरणांना प्राधान्य देत आमदार शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली हरित ऊर्जेकडे वाटचाल अधिक गतिमान होत. याच पार्श्वभूमीवर पुनावळे येथील ७ प्लुमेरिया ड्राइव्ह गृहनिर्माण सोसायटीत उभारण्यात आलेल्या ५७५ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण रविवारी (दि ८) रोजी करण्यात आले. ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने हे ठोस पाऊल टाकण्यात आले आहे असेही आमदार जगताप म्हणाले.**



चिंचवड मतदार संघातील ७ प्लुमेरिया ड्राईव्ह या गृहनिर्माण सोसायटीत उभारण्यात आलेल्या ५७५ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. सोसायटीमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमाला सोसायटीचे अध्यक्ष डॉ गणेश भामे, सचिव शिवराज हराळे, खजिनदार धनंजय पाठक आणि सर्व फेडरेशन कमिटी तसेच रहिवासी उपस्थित होते. आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, गृहनिर्माण सोसायटी स्तरावर उभारण्यात आलेला हा सौर ऊर्जा प्रकल्प शहरातील ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मापदंड मानला पाहिजे. याचा आदर्श शहरातील इतर सोसायटी देखील घेतील असा विश्वास आहे. या प्रकल्पामुळे सोसायटीचा वीज खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

सुमारे ९ ते १० लाख रुपयांचे सोसायटीचे वीज बिल आत्ता ५० हजार ते १ लाख पर्यंत येत आहे. यातून भविष्यातील वीज दरवाढीपासून रहिवाशांना दिलासा मिळणार आहे यामुळे पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळणार आहे. १० एकर परिसरात वसलेल्या आणि ९५० सदनिका व ३ हजार रहिवासी असलेल्या या सोसायटीसाठी हा प्रकल्प दीर्घकालीन ऊर्जा नियोजनाचा भाग असून रहिवाशांच्या लोकसहभागातून साकारलेला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीचे आदर्श उदाहरण ठरत आहे. अडीच कोटी रुपयांची गुंतवणूक करून उभारलेला हा प्रकल्प शाश्वत विकास आणि आर्थिक बचत या दोन्ही बाबींना पूरक ठरणार आहे.

या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होणार असून कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात लक्षणीय घट होऊन पर्यावरण संरक्षणाला हातभार लागणार आहे.हरित व स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढल्याने शहराच्या पर्यावरणीय संतुलनाला बळ मिळणार आहे. आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या हरित ऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जा धोरणाशी सुसंगत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक आहे. गृहनिर्माण सोसायट्यांनी पुढाकार घेतल्यास शहरे ऊर्जा स्वयंपूर्ण बनू शकतात असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान या एकूण खर्च अडीच कोटी रुपये इतका झाला आहे. ४० लाख रुपयांची सबसिडी मिळाली. तसेच आमदार निधी मधून १० लाख रुपये मंजूर केले आहेत.

> “ देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने सक्षम पावले टाकली जात आहे. सौर ऊर्जा त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. हा सौर ऊर्जा प्रकल्प पिंपरी चिंचवड शहरासह पुणे जिल्हा आणि राज्यातील इतर गृहनिर्माण सोसायट्यांसाठी हरित ऊर्जेकडे जाण्याचा मार्ग दाखवणारा आदर्श ठरेल. तसेच पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनशैलीकडे नेणारा प्रभावी टप्पा असणार आहे. पिंपरी चिंचवड शहराला स्मार्ट आणि मेट्रोपॉलिटीन शहराचा मानबिंदू समजले जाते. त्या माध्यमातून पर्यावरण पूरक ऊर्जेच्या दृष्टिकोनातून होणारे असे प्रकल्प नक्कीच इतर अनेक सोसायट्यांना आदर्शवत ठरणार आहेत.
>
> **– शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

# पै. श्लोक ताम्हाणे यांना राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, भारतीय कुस्ती संघ व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 15 वर्षांखालील राज्यस्तरीय फ्रीस्टाईल व ग्रिकोरोमन अंजीक्यपद कुस्ती स्पर्धा 2025-2026 मध्ये पै. श्लोक संदीप ताम्हाणे यांनी ग्रिकोरोमन कुस्ती प्रकारात कांस्यपदक पटकावले.**




श्लोक ताम्हाणे यांचे हे यश त्यांच्या कठोर मेहनतीचे आणि कुस्ती क्षेत्रातील निष्ठेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या या कामगिरीने राज्यातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, “श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत जो उत्कृष्ट पराक्रम केला आहे, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. ही फक्त कांस्यपदक जिंकण्याची गोष्ट नाही, तर मेहनत, चिकाटी आणि धैर्य यांचे उत्तम उदाहरण आहे.

पिंपरी-चिंचवड शहर स्पोर्ट्स सिटी बनवण्याचा संकल्प आम्ही केला आहे. भोसरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती व कबड्डी संकुल सुरू झाले असून, त्या ठिकाणी अनेक मल्ल खेळाडू सराव करीत आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्केटिंग ग्राउंड, बॉक्सिंग रिंग, शुटींग रेंजसुद्धा सुविधा उपलब्ध होत आहेत. यासोबतच मल्टिपर्पज क्रिकेट स्टेडिअमही प्रस्तावित आहे.

श्लोकच्या या यशाने राज्यात कुस्तीच्या क्षेत्रात नव्या पिढीला उत्साह मिळाला असून, भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे नाव उजळवण्यासाठी ही प्रेरणा महत्वाची ठरेल.



> “ पै. श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत जे यश मिळवले आहे, ते त्यांच्या मेहनत, चिकाटी आणि धैर्याचे उत्तम उदाहरण आहे. आम्ही पिंपरी-चिंचवड शहराला स्पोर्ट्स सिटी बनवण्याच्या दिशेने कार्यरत आहोत. भोसरीतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती व कबड्डी संकुल, स्केटिंग ग्राउंड, बॉक्सिंग रिंग आणि शुटींग रेंजसारख्या सुविधा सुरू आहेत. यासोबतच मल्टिपर्पज क्रिकेट स्टेडिअमही प्रस्तावित आहे. राज्य सरकार प्रत्येक प्रतिभावंत खेळाडूच्या विकासासाठी संपूर्ण पाठबळ देत राहील.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046